**महाराष्ट्र शासन**
**इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**
**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन**, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022
**दुरध्वनी क्रं.** 0712-2870120-21 CIN: U85300PN2019NPL187405 **ई मेल** - mahajyotingp@gmail.com

जा.क्र.महाज्योती/आस्था/तपशील/1162/नागपूर/2026-27 दिनांक :- 19/06/2026

## GRE/TOFEL/IELTS & Foreign Language - 2026-27 परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरीता योजनेचा तपशील

महाराष्ट्र राज्यातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सन 2026-27 करीता GRE/TOFEL/IELTS & Foreign Language या परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी मोफत ऑफलाईन व अनिवासी पद्धतीने महाज्योती मार्फत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्याकरीता इच्छूक विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

➢ **योजनेच्या लाभासाठी पात्रता** :-

1. विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा/असावी.
2. विद्यार्थी हा नॉन-क्रिमिलेअर गटातील इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती-भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्ग यापैकी असावा/असावी.
3. प्रशिक्षणाकरीता लाभार्थी विद्यार्थ्याची अंतिम निवड चाळणी परिक्षेद्वारे करण्यात येईल.
4. विद्यार्थ्यांची GRE/TOFEL/IELTS & Foreign Language परीक्षेच्या सामान्य अभ्यासक्रमानुसार चाळणी परीक्षा घेण्यात येईल.
5. चाळणी परीक्षेत प्राप्त गुणांकनानुसार मेरीटच्या आधारे व आरक्षित जागांच्या प्रमाणात पात्र विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल.
6. चाळणी परीक्षेच्या वेळापत्रकाबाबत स्वतंत्रपणे महाज्योतीच्या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

➢ **प्रशिक्षणाचे स्वरूप** :-

1. सदर प्रशिक्षणाचा कालावधी 06 महिन्यांचा असेल.
2. विद्यार्थ्यांना परीक्षेच्या अभ्यासक्रमानुसार प्रशिक्षण देण्यात येईल.
3. प्रशिक्षण अनिवासी स्वरुपाचे असेल.
4. प्रशिक्षण हे ऑफलाईन स्वरुपात असेल.

➢ **आरक्षण** :-

**सामाजिक प्रवर्ग व समांतर आरक्षण पुढीलप्रमाणे** :

| **अ.क्र.** | **सामाजिक प्रवर्ग** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| 1 | इतर मागास वर्ग (OBC) | 59% |
| 2 | विमुक्त जाती - अ (VJ-A) | 10% |
| 3 | भटक्या जमाती - ब (NT-B) | 8% |
| 4 | भटक्या जमाती - क (NT-C) | 11% |
| 5 | भटक्या जमाती - ड (NT-D) | 6% |
| 6 | विशेष मागास प्रवर्ग (SBC) | 6% |
| **एकूण** | | **100%** |

**समांतर आरक्षण पुढीलप्रमाणे** :-

1. प्रवर्गनिहाय महिलांसाठी 30% जागा आरक्षित आहे.
2. दिव्यांगाकरिता 5% जागा आरक्षित आहे.
3. अनाथांसाठी 1% जागा आरक्षित आहे.

➢ **अर्ज करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे** :-

1. आधार कार्ड
2. जातीचे प्रमाणपत्र (Caste Certificate)
3. रहिवासी दाखला (Domicile Certificate)
4. वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate)
5. सर्वोच्च शिक्षण प्रमाणपत्र
6. दिव्यांग दाखला (दिव्यांग असल्यास)
7. अनाथ दाखला (अनाथ असल्यास)

➢ **अर्ज कसा करावा.**

1. महाज्योतीच्या www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावर जाऊन Notice Board मधील "Application for competitive Training program 2026-27" यावर जाऊन ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा.
2. अर्जासोबत तपशीलात नमुद सर्व कागदपत्रे स्वाक्षांकीत करून स्पष्ट दिसतील असे स्कॅन करुन जोडावे.
3. विद्यार्थ्याने अर्जामधील दिलेली सर्व माहिती पूर्ण भरायची आहे त्याशिवाय योजनेकरिता नोंदणी अर्ज वैध मानले जाणार नाही.

➢ **अटी व शर्ती** :-

1. अर्ज करण्याचा अंतिम **दि**.10/07/2026 राहील.
2. पोस्टाने किंवा ई-मेल व्दारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.
3. जाहिरात रद्द करणे, मुदतवाढ देणे, अर्ज नाकारणे व स्विकारणे याबाबतचे सर्व अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक, महाज्योती यांचे राहतील.
4. प्रशिक्षणाकरीता निवड झालेले विद्यार्थी ज्या दिनांकास संस्थेत प्रशिक्षणाकरीता रुजु होतील त्या दिनांकापासुन त्यांना महाज्योतीच्या धोरणानुसार विद्यावेतन लागू होईल. तथापि प्रत्यक्ष प्रशिक्षणास 75% उपस्थिती असणाऱ्यांनाच विद्यावेतन देय राहील.
5. कोणत्याही माध्यमातुन व अंतीम निवड प्रक्रियेच्या तसेच प्रशिक्षणाच्या कोणत्याही टप्यावर विद्यार्थ्यांनी सादर केलेली माहिती चुकीची, दोषपूर्ण व दिशाभूल करणारी असल्यास विद्यार्थ्यांची निवड रद्द करण्यात येईल.
6. विद्यार्थाचे बँक खाते आधार क्रमांकाशी संलग्न असणे आवश्यक असून विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणारे विद्यावेतन त्यांच्या आधार क्रमांकाशी संलग्न असलेल्या बँक खात्यात जमा करण्यात येईल.
7. अर्ज भरतांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी आल्यास कार्यालयीन वेळेत केवळ महाज्योतीच्या Call Centre वर संपर्क करावा : **संपर्क क्र** - 0712-2870120/21

(स्वा.)
(मिलिंद नारिंगे)
**व्यवस्थापकीय संचालक**
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था,
(महाज्योती) महाराष्ट्र राज्य, नागपूर